



■ २२ कॅरेट सोने दर : ९५,०००/- ■ चांदी दर : १,२०,०००/-


शब्दांना सत्याची धार

# प्रहार

सिंधुदुर्ग • बुधवार २७ ऑगस्ट, २०२५

RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३३७८७ • वर्ष २१ • अंक २८६ • पाने ८ • ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in







# मंगलमुर्तीचा आजपासून दिमाखात महोत्सव

## गावागावात चैतन्याचा उत्सव : गणेशभक्तांवर पावसाचे सावट

## ७२ हजार ७५५ घरगुती, तर ३२ सार्वजनिक गणेशोत्सव

**सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्गात चैतन्याचा महासागर उसळला आहे. साक्षात विघ्नहर्ता, सुखकर्ता, दुखहर्ता गणरायाचा महाउत्सव आजपासून सुरू होत असल्यामुळे आसमंतात एक अलौकिक आणि मंगलमय ऊर्जा संचारली आहे. या उत्सवाच्या पूर्वसंध्येला आपल्या लाडक्या बाप्पाला आणण्यासाठी आणि त्यांच्या स्वागतासाठी लागणाऱ्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी भक्तगणांनी बाजारपेठांमध्ये गर्दी केली होती. कोकणवासियांचा हा महाउत्सव.. त्यात सिंधुदुर्गवासीयांचा हा उत्सव म्हणजे एक भावनिक किनार...जिल्ह्यात या वर्षी ७२ हजार ७५५ घरगुती, तर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे ३२ श्रीगणेशमूर्ती विराजमान होणार आहेत अशी नोंद पोलिस प्रशासनाकडून आली आहे. तर गेल्या दोन दिवसांत मोठ्या संख्येने विविध भागातून गणेशभक्त आपल्या गावी परतले आहेत.

मुंबई आणि इतर शहरांमधून आपापल्या मूळ गावी परतलेले चाकरमानी हे केवळ शरीराने प्रवास करत नाहीत, तर ते त्यांच्या परंपरेकडे, त्यांच्या मुळाकडे आणि त्यांच्या संस्कृतीकडे परत येत आहेत. हा उत्सव त्यांच्यासाठी फक्त पूजा-अर्चा नसून, तो एक आत्मिक सोहळा आहे, जिथे सर्व कुटुंब एकत्र येऊन आध्यात्मिक बंध अधिक घट्ट करतात.बुधवारी सकाळी गणपती बाप्पाची मूर्ती आपल्या घरी आणून तिची विधिवत प्रतिष्ठापना केली जाईल. हा क्षण प्रत्येक भक्तासाठी अत्यंत पवित्र आणि प्रतीक्षेचा असतो. या क्षणापासून पुढील काही दिवस संपूर्ण कोकणभूमी ही बाप्पाच्या भक्तीत आणि आनंदाच्या उत्सवात रंगून जाईल. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग- ४, सावंतवाडी ७, आचरा १, मालवण २, कणकवली ५, बांदा १, कुडाळ ४ वेंगुर्ला ३, देवगड १, वैभववाडी ४ अशा एकूण ३२ सार्वजनिक गणपतींची स्थापना होणार आहे.

(पान २ वर)

### आज मुसळधार पाऊस ..

सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक २६ ऑगस्ट, २०२५ रोजी काही ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची तर दिनांक २७, २८ व २९ ऑगस्ट रोजी तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे. कमाल तापमानामध्ये काही अंशानी घट व किमान तापमानामध्ये काही अंशानी वाढ होऊन ते अनुक्रमे २९ ते ३० व २४ ते २६ अंश सेल्सिअस इतके राहण्याची शक्यता आहे. आर्द्रतेतील वाढीबरोबर हवामान पुर्णतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्याकडून वर्तविण्यात आला आहे.






कोकणच्या महाउत्सवाला आजपासून सुरुवात होत असून देवगड तालुक्यात डोलीतून गणेश मूर्ती नेताना श्रीगणेशभक्त.(छाया:वैभव केळकर).

## सिंधुदुर्गवासीयांना आता सागरी वाहतुकीचाही आनंद

# मुंबई ते विजयदुर्ग सुसाट..

### १ सप्टेंबरपासून रो-रो सागरीवाहतूक सुरू : मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांची घोषणा





मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी मंगळवारी सायंकाळी एमटूएम बोटीवर जात आसनव्यवस्था तसेच प्रवासी कक्षाची पाहणी करत कंपनी व्यवस्थापनाशी चर्चा केली.

- **दक्षिण आशियातील सर्वात वेगवान: एमटूएम बोट २५ नॉट्स वेगाने धावणार**
- **वाहन वाहतुकीचीही सोय: बोटीतून प्रवाशांसोबतच चारचाकी आणि दुचाकी वाहने नेता येणार**
- **सुरक्षित आणि वेगवान प्रवास: सर्व परवाने प्राप्त**
- **कोकणच्या पर्यटनला मिळणार अधिक गती**

**मुंबई (प्रतिनिधी)**

गणेशोत्सव, होळी अशा विविध सणांनिमित्त कोकणवासीय कोकणात मुक्कामी जातात. त्यांचा प्रवास अधिक सुखकर व्हावा यासाठी राज्य शासनाने मुंबई ते (जयगड) रत्नागिरी आणि मुंबई ते (विजयदुर्ग) सिंधुदुर्ग रो-रो सेवा सुरू केली असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुंबई ते कोकण समुद्रामार्गे प्रवास करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या रो-रो सेवेची माहिती देण्यासाठी मंगळवारी पत्रकार परिषदेचे मंत्रालयात आयोजन करण्यात आले होते. यावेळी कोकणवासीयांना आणि पर्यटकांना या वाहतुक सेवेमुळे मोठा दिलासा मिळणार असल्याचे मंत्री ना. राणे यांनी सांगितले.

मंत्री नितेश राणे म्हणाले की, केंद्रीय शिपींग मंत्रालय आणि राज्याच्या बंदरे विभागाने या जलवाहतूक सेवेस अंतिम मंजूरी दिली आहे.

(पान २ वर)

## सौंदाळे, जामसंडे येथे शासकीय जमिनीवर मत्स्यव्यवसाय महाविद्यालय स्थापन होणार

- **मत्स्य व्यवसाय महाविद्यालयासाठी १६१ कोटींच्या निधी मान्यतेसाठीचा प्रस्ताव सादर करा**
- **कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासोबत झाली मत्स्यव्यवसाय, बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांची बैठक**



**मुंबई (वृत्तसंस्था)**

मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी देवगड तालुक्यातील सौंदाळे, जामसंडे येथे शासकीय जमिनीवर मत्स्यव्यवसाय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी १६१ कोटींच्या निधी मान्यतेसाठीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याची कार्यवाही गतीने करावी, असे निर्देश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

देवगड तालुक्यात शासकीस मत्स्य महाविद्यालय सुरू करण्याबाबत मंत्रालयात आयोजित बैठकीत कृषीमंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. यावेळी मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे,कृषी विभागाचे प्रधानसचिव विकास चंद्र रस्तोगी, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या वर्षा लड्डा-उंटवाल,दापोली कृषी विद्यापीठाचे कुलगुरू संजय भावे, सहसंशोधक कल्पेश शिंदे कृषी विभागाच्या उपसचिव प्रतिभा पाटील यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी या भागात शासकीय

(पान २ वर)


गणेश उत्सवाच्या सर्व गणेश भक्तांना हार्दिक शुभेच्छा!

- प्रहार परीवार


### उद्या अंक नाही

श्री गणेश चतुर्थी निमित्त प्रहार कार्यालयास बुधवार दि. २७ ऑगस्ट रोजी सुट्टी असल्याने गुरूवार २८ ऑगस्टचा अंक प्रसिध्द होणार नाही. याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार आणि हितचिंतकांनी नोंद घ्यावी.

**-महाव्यवस्थापक**

## शिंदे समितीला ६ महिन्यांची मुदतवाढ

- **सरकारने जरांगेंची मागणी केली मान्य**

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर मंत्रालयात मराठा आरक्षण मंत्रीमंडळ उपसमितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांवर सविस्तर चर्चा झाली असून, त्यांच्या पहिल्या मागणीला मान्यता देण्यात आल्याची माहिती मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. बैठकीत हैदराबाद, मुंबई आणि सातारा गॅझेट तसेच 'सगेसोयरे' यासंदर्भातील मागण्यांवर चर्चा झाली. मराठा आरक्षणासाठी स्थापन करण्यात आलेल्या शिंदे समितीला ६ महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. ही मागणी मनोज जरांगे यांनी केली होती, जी उपसमितीच्या पहिल्याच बैठकीत मान्य करण्यात आली आहे.

**सरकारची भूमिका सकारात्मक**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारची भूमिका सकारात्मक असल्याचे विखे पाटील यांनी स्पष्ट केले. "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी (पान २ वर)

## लंडनमध्ये साकारणार महाराष्ट्र भवन!

### मराठीजनांना मिळणार हक्काचे सामाजिक केंद्र, शासनाकडून ५ कोटींचा निधी मंजूर

**मुंबई (वृत्तसंस्था)**

लंडनमधील मराठी लोकांना आता स्वतःचे सांस्कृतिक केंद्र मिळणार आहे. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र मंडळ, लंडन या संस्थेला 'चर्च ऑफ इंग्लंड'ची एक जुनी इमारत खरेदी करण्यासाठी आणि तिथे 'महाराष्ट्र भवन' उभारण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. याबाबतची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून लंडनमध्ये स्वतःचे सांस्कृतिक केंद्र असावे, अशी मराठी लोकांची मागणी आता पूर्ण होणार आहे. या मदतीबद्दल महाराष्ट्र मंडळाने शासनाचे आभार मानले आहेत.

लंडनमधील मराठीजनांना आपल्या हक्काचे आणि स्वतःच्या मालकीचे सांस्कृतिक भवन मिळावे, या अनेक वर्षांच्या मागणीला आता मूर्त स्वरूप मिळणार आहे. महाराष्ट्र मंडळ, लंडन या संस्थेला लंडनमधील 'चर्च ऑफ इंग्लंड'ची इमारत खरेदी करुन तिथे 'महाराष्ट्र भवन' उभारण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

**महात्मा गांधींच्या सचिवांनी केली होती संस्थेची स्थापना**

महाराष्ट्र मंडळ, लंडन ही परदेशातील सर्वात जुनी मराठी संस्था मानली जाते.

(पान २ वर)

## सिंधुदुर्गच्या नव्या जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे


### विद्यमान जिल्हाधिकारी अनिल पाटील ३१ ऑगस्ट रोजी होणार सेवानिवृत्त

**सिंधुदुर्गनगरी (प्रतिनिधी)**

विद्यमान जिल्हाधिकारी अनिल पाटील, भाप्रसे यांच्या सेवा निवृत्तीमुळे रिक्त होत असलेल्या जागी सांगली जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीम. तृप्ती धोडमिसे (भाप्रसे) यांची शासनाने नियुक्ती केली आहे.



अनिल पाटील



तृप्ती धोडमिसे

त्यामुळे त्या सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी (पान २ वर)

# 'मेक इन इंडिया' ही 'मेक फॉर द वर्ल्ड'ची सुरुवात

### मारुती सुझुकी ईव्ही युनिटच्या उद्घाटनप्रसंगी पंतप्रधानांचे विधान

**नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज मारुती सुझुकीच्या ईव्ही युनिटचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी, भारताच्या 'मेक इन इंडिया' प्रवासातील एका नवीन अध्यायाची सुरुवात असल्याचे वर्णन केले. आता भारत 'मेक इन इंडिया'च्या पलीकडे जाऊन 'मेक फॉर द वर्ल्ड'कडे वाटचाल करत आहे असे म्हटले. पंतप्रधान मोदी यांनी यावेळी, "आपण एवढ्यावरच थांबणार नाही, तर भारत सेमी-कंडक्टर क्षेत्रात पुढे जात आहे, ज्याला आणखी पुढे नेले पाहिजे" असेही आवाहन त्यांनी यावेळी केले. त्यासोबतच त्यांनी पुढील आठवड्यात जपान दौऱ्याची घोषणाही केली.




पंतप्रधान मोदींनी यावेळी, गणेश उत्सवाच्या उत्साहात आज भारत-जपान मैत्रीला एक नवीन आयाम मिळाला आहे, असे म्हणत दोन्ही देशातील व्यापार वाढीविषयी विश्वास व्यक्त केला. त्यांनी मारुतीच्या प्रवासाला "किशोरवयीन" वयाशी जोडले. तसेच ज्याप्रमाणे तरुणांची स्वप्ने किशोरावस्थेत उडतात, त्याचप्रमाणे मारुती सुझुकी आता ईव्ही क्षेत्रात नवीन पंख पसरवणार आहे. गुजरातमधील कंपनीचा हा नवा टप्पा उत्साह आणि उत्साहाने भरलेला आहे." असे म्हटले.

पंतप्रधान मोदींनी आठवण करून दिली की २०१२ मध्ये, (पान २ वर)

## ओबीसींच्या कल्याणासाठी कॅबिनेट उपसमितीची होणार स्थापना

### महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई**

मराठा समाजाच्या आरक्षण आंदोलनाच्या आणखी एका टप्प्याच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र सरकारने मंगळवारी ओबीसींसाठी कल्याणकारी उपाययोजना जलद करण्यासाठी आणि नोकरीच्या कोट्याशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी कॅबिनेट उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला, असे पीटीआयने म्हटलं आहे. राज्यात आधीच ओबीसी कल्याणासाठी स्वतंत्र मंत्रालय आहे, ज्याचे नेतृत्व सध्या भाजपच्या कॅबिनेट सदस्याकडे आहे.

सूत्रांनी सांगितले की, ओबीसी (इतर मागासवर्गीय) साठीची कॅबिनेट उपसमिती समुदायाच्या कल्याणकारी उपाययोजनांना गती देण्यासाठी आणि कोट्याशी संबंधित मुद्दे सोडवण्यासाठी काम करेल.सत्ताधारी महायुती युतीतील तिन्ही भागीदार - भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी - यांनी आपापल्या मंत्र्यांची नावे दिल्यानंतर नवीन संस्थेच्या सदस्यांची घोषणा केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

## आजपासून भारतावर ५० % अमेरिकन टॅरिफ

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

अमेरिकन सरकारने भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर अतिरिक्त २५% कर लादण्याची अधिकृत अधिसूचना जारी केली आहे. दंड म्हणून लावण्यात आलेला हा कर भारतीय वेळेनुसार २७ ऑगस्ट रोजी सकाळी ९:३१ वाजल्यापासून (पान २ वर)